पुढारी

# ज्ञानयुगावर ग्रंथांचे अधिराज्य : देशपांडे

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



आजचे युग हे ज्ञानयुग असून यावर ग्रंथांचे अधिराज्य आहे, असे प्रतिपादन सांगली येथील श्रीमती पुतळाबेन शहा शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या विस्तार सेवा केंद्राचे माजी समन्वयक अरविंद देशपांडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय ऑनलाईन वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात ते बोलत होते. 'वाचनसंस्कृती व नवोपक्रम' या विषयावर विचार मांडले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. देशपांडे यांनी व्याख्यानात त्यांनी वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी राबविलेल्या विविध नवोपक्रमांची माहिती दिली. लेखन स्पर्धा, निवडक पुस्तकांची नावे, त्यातील मजकूर आदी अनुभवपर मार्गदर्शन त्यांनी केले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, वाचन प्रक्रियेतून चांगला लेखक घडणे ही स्वाभाविक प्रक्रिया आहे. मात्र, चांगला माणूस घडणे ही या प्रक्रियेची अंतिम साध्यता आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी प्रास्ताविक केले. उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. युवराज जाधव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सचिनकुमार पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, सहायक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात आदी उपस्थित होते.

22 OCT 2021 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांचे शंभर टक्के लसीकरण पूर्ण करा

## उच्चशिक्षणमंत्री, आरोग्यमंत्री यांच्या विद्यापीठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत सूचना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालये आणि विद्यापीठ अधिविभागातील शंभर टक्के विद्यार्थ्यांचे लसीकरण येत्या काही दिवसांत पूर्ण करावे, अशा सूचना उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत, आरोग्य मंत्री राजेश टोपे, पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी कुलसचिव व इतर अधिकाऱ्यांच्या बैठकीत दिल्या.

महाविद्यालये बुधवारपासून सुरू झाली आहेत, त्या पार्श्वभूमीवर गुरुवारी उच्चशिक्षण विभागातील अधिकारी,



विद्यापीठांचे कुलसचिव यांची बैठक झाली. मिशन युवा स्वास्थ्य उपक्रम राबविण्यात येणार आहे. २५ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त लसीकरण करण्यात यावे. स्थानिक पातळीवर प्राचार्य, आरोग्य विभागातील कर्मचारी यांच्या सहकार्याने लसीकरण मोहीम राबवावी. जास्तीत जास्त लसीकरण पूर्ण करणाऱ्या महाविद्यालयांचा सत्कार करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालय, अधिविभागातील ६५७ विद्यार्थ्यांनी पहिला डोस तर ५ हजार ३७० विद्यार्थ्यांनी दुसरा डोस घेतला आहे. १ लाख ९४ हजार ९३६ विद्यार्थ्यांनी अद्याप एकही डोस घेतला नसल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर

### लसीकरण, वसतिगृहाचा आढावा

उच्च व तंत्रशिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी गुरुवारी दुपारी राज्यातील सर्व विभागीय सहसंचालकांची बैठक घेतली. यात विद्यार्थ्यांचे लसीकरण आणि वसतिगृह सुरू करण्याबाबतचा आढावा घेतला. त्यानंतर सायंकाळी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्राचार्यांना प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या लसीकरणाबाबत ऑनलाईन बैठकीत सूचना दिल्याचे कोल्हापूर विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. हेमंत कटरे यांनी सांगितले.

22 OCT 2021
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवीन पिढीला गांधी विचारांशी जोडण्याची गरज

प्रतिनिधी
कोल्हापूर

महात्मा गांधी यांच्या विचारांचे विद्रुपीकरण रोखण्यासाठी गांधी विचारांचे सैद्धांतिक, भावनिक, वैचारिक पातळीवर प्रसारण करावे लागेल. नव्या पिढीला गांधीजींच्या चैतन्यदायी विचारांची नव्याने ओळख करून देत त्यांच्या विचारांशी जोडण्याची गरज आहे, असे प्रतिपादन गांधी विचारांचे अभ्यासक अरुण खोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्रामार्फत 'डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानमाला' अंतर्गत आयोजित 'गांधींच्या पुनःस्मरणाची गरज का?' यावरील ऑनलाईन व्याख्यानात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर होते.



खोरे म्हणाले, महात्मा गांधी यांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यासह सामाजिक योगदान अतुलनीय आहे. त्याची दखल जगभरातील देशांनी घेतली आहे. गतसहस्रकावर ठसा उमटवणारे सर्वाधिक प्रभावी नेतृत्व म्हणून गांधीजींच्या नावावर जगाने शिक्कामोर्तब केले आहे. अलिकडे गांधी विचार पुसून टाकण्याचे, त्यांची प्रतिमा संकुचित करण्याचे प्रयत्न जाणीवपूर्वक केले जात आहेत. गांधी चरित्रातील छोटे छोटे तपशील घेऊन त्यांची मोडतोड करून सादर करण्याचे काम केले जात आहे. त्यासाठी तज्ज्ञ अभ्यासकांची मदत घेतली जात आहे, हे चिंताजनक आहे. गांधीजींच्या संदर्भात कार्य करणाऱ्या सेवा संस्था, संघटनांची जबाबदारी त्यामुळे वाढली आहे. डॉ. चौसाळकर म्हणाले, हत्या, हिंसा, द्वेष अथवा सूडभावना या मानवजातीच्या विरुद्ध आहेत. गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी रामदास भटकळ, दशरथ पारेकर, नागोराव कुंभार, डॉ. अरुण भोसले, डॉ. नंदा पारेकर, विवेक कोरडे, प्रा. चंद्रकांत लंगरे, किशोर बेडकिहाळ उपस्थित होते.

22 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रामाणिक कष्टातूनच यश निश्चित

## कुलगुरू डॉ. शिर्के : वडणगेत कृती समितीतर्फे विविध भूमिपुत्रांचा सत्कार

वडणगे, ता. २१ : 'कोणतेही क्षेत्र असले तरी वलय निर्माण करण्याची ताकद स्वतःकडे असेल तर कुणाच्या ओळखीची गरज नाही, प्रामाणिकपणे कष्ट केल्यास यश निश्चितच पाठीमागून येते. प्रत्येक तरुणाने ध्येयवेडे होणे गरजेचे आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. वडणगे (ता. करवीर) येथील सर्वपक्षीय कृती समितीतर्फे पार्वती मंदिरात झालेल्या विविध क्षेत्रांत भूमिपुत्रांनी मिळवलेल्या पुरस्कारानिमित्त त्यांच्या सत्कार सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. बाळासाहेब पाटील अध्यक्षस्थानी होते.




**वडणगे : येथे सर्वपक्षीय कृती समितीतर्फे प्राचार्य डॉ. महादेव नरके, अजित पाटील, अरुण पाटील, रघुनाथ पाटील यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी अन्य मान्यवर.**

डी. वाय. पाटील पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. महादेव नरके यांना राज्यस्तरीय व रोटरी सनराईजचा कोरोना योद्धा पुरस्कार, तसेच डॉ. अजित पाटील यांना रोटरीचा कोरोना योद्धा पुरस्कार, रघुनाथ पाटील यांना रोटरीचा आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार, निर्माण कन्स्ट्रक्शनचे अरुण पाटील यांना कर्नाटक महाराष्ट्र गोवा राज्यांचा बांधकाम अभियंता गौरव पुरस्कार मिळाल्याबददल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते त्यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार झाला.

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य नरके म्हणाले, ''ज्या गावाने मला वाढवले, घडवले त्यागावाचे उपकार आहेत. २५ वर्षांत केलेल्या समाजकार्याचे फळ म्हणजेच हा सत्कार आहे. जगात कुठेही गेलो तर जन्मभूमीतील सत्कार कायम स्मरणात राहील.''

अरुण पाटील, मुन्वर मुल्ला, इंद्रजित पाटील, डॉ. सुनील पाटील, सरपंच सचिन चौगले, बी. एच. पाटील यांनी मनोगतं व्यक्त केली. या वेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा सत्कार सर्वपक्षीय कृती समिती व शिवपार्वती झाडवाट कुरण मंडळातर्फे झाला. उपसरपंच सयाजी घोरपडे, विविध पदाधिकारी, सर्व पक्षीय समिती सदस्य आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. विलास पोवार यांनी स्वागत केले. राजू पोवार यांनी प्रास्ताविक केले. आर. बी. देवणे यांनी सूत्रसंचालन केले. सुनील परीट यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
22 OCT 2021 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रत्येक तरुणाने ध्येयवेडे होणे गरजेचे

## कुलगुरु डॉ.डी.टी.शिर्के : वडणगेत सर्वपक्षीय कृती समितीच्यावतीने गुणवंतांचा सत्कार



**वडणगे : प्राचार्य डॉ. महादेव नरके, अजित पाटील, अरुण पाटील, रघुनाथ पाटील या भूमिपुत्रांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सोबत मान्यवर.**

प्रतिनिधी
वडणगे

क्षेत्र कोणतेही असो, वलय निर्माण करण्याची ताकद स्वत:कडे असेल तर कोणाची ओळख लागत नाही. कोणतीही गोष्ट जमणार नाही, असे नसते. फक्त त्यासाठी जिद्द, ध्येय बाळगावे. प्रामाणिकपणे कष्ट केल्यास निश्चितच यश पाठीमागून येते. त्यासाठी प्रत्येक तरुणाने ध्येयवेडे होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. वडणगे (ता. करवीर) येथे सर्वपक्षीयांच्यावतीने येथील पार्वती मंदिराच्या प्रांगणात आयोजित भूमिपुत्रांच्या सत्कार ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी बाळासाहेब पाटील होते.

यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. डी. वाय. पाटील पॉलिटेक्नीकचे प्राचार्य डॉ. महादेव नरके, अजित पाटील, रघुनाथ पाटील, अरुण पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी जि. प. माजी सदस्य बी एच. पाटील, सरपंच सचिन चौगले, पं. स. सदस्य इंद्रजीत पाटील, डॉ विलास पोवार, डॉ. सुनील पाटील, उपसरपंच सयाजी घोरपडे, विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते. राजू पोवार यांनी प्रास्ताविक, आर. बी. देवणे यांनी सूत्रसंचालन केले.